**प्रकल्प प्रवर्तक मे. श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, पोस्ट-सदाशिवनगर, गाव-पुरंदावडे, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर - ४१३ १११, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावित मोलॅसिस (B व C) वर आधारित विस्तारिकरण आसवणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन वरुन ४५.० किलोलिटर प्रतिदिनपर्यत, तसेच प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता २,५००.० मे.टन प्रतिदिनवरुन ७,०००.० मे.टन प्रतिदिन प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, पोस्ट-सदाशिवनगर, गाव-पुरंदावडे, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर - ४१३ १११, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रस्तावित मोलॅसिस ( B व C) वर आधारित विस्तारिकरण आसवणी प्रकल्प क्षमता ३०.० किलोलिटर प्रतिदिन वरुन ४५.० किलोलिटर प्रतिदिनपर्यत, तसेच प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता २,५००.० मे.टन प्रतिदिनवरुन ७,०००.० मे.टन प्रतिदिन प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक १८ मे, २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता प्रकल्प स्थळ - मे. शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, पोस्ट-सदाशिवनगर, गाव-पुरंदावडे, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर - ४१३ १११, महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. निखिल मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. अभिजीत पाटील, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तसेच श्री. बाबासाहेब कुकडे, प्रादेशिक

अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रस्तावित प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांचा त्यांच्या पोस्ट-सदाशिवनगर, गाव-पुरंदावडे, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर - ४१३ १११,

महाराष्ट्र राज्य येथील कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित मोलॅसिस ( B व C) वर आधारित विस्तारिकरण आसवणी प्रकल्प क्षमता ३० किलोलिटर प्रतिदिन वरुन ४५ किलोलिटर प्रतिदिनपर्यत, तसेच प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता २,५०० मे.टन प्रतिदिनवरुन ७,००० मे.टन प्रतिदिन विस्तारिकरण प्रकल्प संदर्भात पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक १४/०१/२०२६ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ येथे प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग बी-१ - अनुसुची ५ (जे)-साखर उद्योग व ५ (जी) - आसवणी प्रकल्प अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यमापन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २४-०९-२०२५ रोजी सादर केला व त्या अर्जास महाराष्ट् शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०६-१०-२०२५ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार

यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० कि.मी. त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ऑक्टोबर, २०२५ ते डिसेंबर, २०२५ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले.

तसेच प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर करण्यात आलेला होता.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक. एमपीसीबी/जेडी(डब्लुपीसी)/इएनव्ही-पीएच/बी-२६०३१३-एफटीएस-०११४ दिनांक १३/०३/२०२६ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक १८ मे, २०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजता प्रकल्प स्थळ - मे. शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, पोस्ट-सदाशिवनगर, गाव-पुरंदावडे, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर - ४१३ १११, महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण

मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश दिनांक ०८-०५-२०२६ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी -<br>प्रादेशिक अधिकारी - पुणे,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>पुणे | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>सोलापूर | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार यात मराठीत व दैनिक दिव्यमराठी यात इंग्रजीत दिनांक १८-०४-२०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत

करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

| | |
|---|---|
| १) | मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर, |
| २) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर, |
| ३) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहिल्यानगर, |
| ४) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ |
| ५) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२ |
| ६) | प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग सेंटर, ३रा मजला, वाकडेवाडी, जुना मुंबई-पुणे रस्ता, पुणे - ४०० ००३ |
| ७) | उप प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,ब/४, बाळी बिल्डिंग, सिव्हिल लाईन्स, शासकीय दूध डेअरीसमोर, सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३ |
| ८) | तहसीलदार, तहसील कार्यालय माळशिरस, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर, |
| ९) | गटविकास अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, तालुका-माळशिरस,जिल्हा-सोलापूर, |
| १०) | ग्रामपंचायत कार्यालये- मौजे - सदाशिवनगर, पुरंदावडे, येळीव, भांबुर्डी, जाधववाडी, तामशिदवाडी, मांडवे, मेडद, मारकडवाडी, कन्हेर, इस्लामपूर, कचरेवाडी, माळशिरस, उंबरे दहिगांव, कदमवाडी, फोंडशिरस, गिरवी, तिरवंडी, गोरडवाडी, नातेपुते, भांब, मोटेवाडी, तालुका-माळशिरस,जिल्हा-सोलापूर, |
| ११) | संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई § मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे. |

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, प्रकल्प नाकारणे किंवा प्रकल्पाची शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. श्री शंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, पोस्ट-सदाशिवनगर, गाव-पुरंदावडे, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूर - ४१३ १११, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित मोलॅसिस ( B व C) वर आधारित आसवणी प्रकल्प क्षमता ३०किलोलिटर प्रतिदिन वरुन ४५ किलोलिटर प्रतिदिनपर्यत, तसेच प्रस्तावित ऊस गाळप क्षमता २,५०० मे.टन प्रतिदिनवरुन ७,००० मे.टन प्रतिदिन प्रकल्प विस्तारिकरण योजिलेले आहे. त्यामुळे या विस्तारिकरण प्रकल्पासाठी अतिरिक्त जमिन ही लागणार नाही.

प्रकल्प विस्तारिकरणासाठी अंदाजे भांडवली गुंतवणूक ही रु. २०८.३१ कोटी अपेक्षित आहे. त्याच्या ०.७६% म्हणजे सुमारे रु. १६०.० लाख हे प्रकल्प परिसरातील विविध गावांमध्ये भविष्यात खर्च करण्यात येतील.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार हरितपट्टा विकासासाठी प्रति हेक्टर जमिनीवर २,५०० झाडे लावणे/उपलब्ध असणे आवश्यक आहे. कारखान्याचे एकूण क्षेत्र ३,३०,८२०.० चौ.मी. आहे. कार्यरत प्रकल्पात हरितपट्टा क्षेत्र ५९,६५५.० चौ.मी. असून सुमारे १०,००० झाडे लावलेली आहेत. तर विस्तारिकरण प्रकल्पांतर्गत हरितपट्टा क्षेत्र हे ५०,३४५.० चौ.मी. असेल व सुमारे ७,५५० झाडे लावण्यात येतील. म्हणजे प्रकल्पाच्ययया एकूण १,१०,०००.० चौ.मीटरच्या क्षेत्राच्या ३३% हरितपट्टा विकसित करण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक उद्योगात हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करुन नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यासाठी पावसाचे पाणी साठवण प्रणाली अवलंबविण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. रुफटॉप हार्वेस्टिंगव्दारे १५,६०० वर्ग मीटर एवढ्या क्षेत्रावरुन ६,५५२.० घनमीटर इतके पावसाचे पाणी तर सरफेस हार्वेस्टिंगव्दारे ३९,९६७.० घनमीटर इतके पाणी टाक्यांमध्ये साठविण्यात येईल. एकूण तीन टाक्यांची क्षमता ही २५.० लाख लिटर एवढी आहे.

प्रस्तावित प्रकल्पात उत्पन्न होणारे घरगुती सांडपाणी व औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर प्रकल्प उत्पादन प्रकियेतच करण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. प्रस्तावित प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण पूर्ण करताना सांगितले की, सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक ग्रामपंचायतीच्या महसूलात वाढ होईल. तसेच स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त होईल. त्यामुळे येथील सामाजीक, आर्थिक जीवनमानात आमूलाग्र बदल होतील. सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे. आपले विचार, सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी

नोंदविताना जर तो मुद्दा उपस्थितांना अगोदर उपस्थित केलेला असेल, तर तो मांडण्याची आवश्यकता नाही, जेणेकरुन अधिक उपस्थितांना संधि देता येतील.

आयोजक यांनी उपस्थितांना सांगितले की, आपण उपस्थित करण्यात येणा-या मुद्द्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला माईकसमोर येऊन संधि देण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री. विष्णू बबन भोंगळे, माजी सरपंच, सदाशिवनगर ग्रामपंचायत,तालुका-माळशिरस,जिल्हा-सोलापूरः-**

विस्तारिकरणानंतर प्रकल्पात सदाशिवनगर ग्रामपंचायत हद्दीतील व आजूबाजूच्या परिसरातील स्थानिकांना रोजगाराची संधि प्राप्त होतील काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की, प्रकल्प व्यवस्थापनाने आसवणी प्रकल्पाचे मोलॅसिस ( B व C) वर आधारित ३० किलोलिटर प्रतिदिन वरुन ४५ किलोलिटर प्रतिदिनपर्यत, विस्तारिकरण, तर साखर कारखान्यात ऊस गाळप क्षमता २,५०० मे.टन प्रतिदिनवरुन ७,००० मे.टन प्रतिदिन विस्तारिकरण करण्याचे नियोजन केलेले आहे. साखर आयुक्तांच्या कर्मचारी आकृत्तीबंधाच्या (staffing pattern) निर्देशांनुसार विस्तारिकरण प्रकल्पात अतिरिक्त २००-२५० स्थानिक व्यक्तींची प्रकल्पात गरज

भासणार आहे. म्हणजे अतिरिक्त २००-२५० स्थानिक व्यक्तींना रोजगाराची संधि मिळू शकते.

२) **श्री. देविदास महादेव ढोपे, उपसरपंच, पुरंदावडे ग्रामपंचायत, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार आहे काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या निर्देशांनुसार सद्यस्थितीत विस्तारीकरण प्रकल्पात उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रकल्पातील एसटीपीमध्ये आणि ईटीपीमध्ये प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्प उत्पादन प्रकियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पात कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट (सीपीयु) ही सयंत्रणा राबविण्यात येणार आहे. प्रकल्पात प्रक्रिया करण्यात आलेले सांडपाणी हे सीपीयुमध्ये शुध्दीकरण करुनच प्रकल्प प्रक्रियेतच त्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. त्याशिवाय विस्तारिकरणास परवानगी मिळणारच नाही.

३) **श्री. शरद बापूराव साळुंखे,प्रगतशील बागायतदार, मांडवे,तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

विस्तारिकरणानंतर उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर प्रक्रिया केलेले सांडपाणी शेतीसाठी वापरता येईल का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की ईटीपीमध्ये प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यात जे हानीकारक घटक राहतील, त्यावर प्रकल्पातील अत्याधुनिक कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट (CPU) मध्ये प्रक्रिया करुन सांडपाण्याचे शुध्दीकरण करण्यात येऊन ते शेतीसाठी वापरण्यायोग्य करण्यात येणार आहे. ते तंत्रज्ञान आपण येथे राबविणार आहोत. त्यामुळे प्रक्रिया केलेले सांडपाणी हे शेतीसाठी वापरण्यास काहीही हरकत नाही.

**४) श्री. शिवाजी दिगंबर जाधव, राहणार-जाधववाडी,तालुका-माळशिरस,जिल्हा-सोलापूरः-**

विस्तारिकरण प्रकल्पात जे कंपोस्ट तयार होणार आहे, ते स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येणार का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की, आसवणी प्रकल्पात ३०.० केएलपीडी प्रकल्पात जे कंपोस्ट तयार होते, त्या बॉयलरचे कंपोस्ट पूर्वीसारखेच शेतक-यांना खत म्हणून उपलब्ध करुन देण्यात येईल. विस्तारिकरण ४५ केएलपीडीपर्यत करण्यात येणार असल्याने जे अतिरिक्त १५ केएलडी आसवणीतून प्रकल्पातून जे कंपोस्ट तयार होईल, त्यासाठी नविन ड्रायर कार्यान्वित करण्यात येऊन कंपोस्टचे रुपांतर पावडर स्वरुपात करणार असून ते स्थानीक शेतक-यांना ऊसासाठी व इतर पीकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**५) श्री. विष्णुपंत आण्णा वाघमोडे, मा. सदस्य, भांबुर्डी ग्रामपंचायत, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात कुठल्या विभागात नविन कामगारांची भरती करण्यात येईल?

विस्तारिकरण प्रकल्पात मिल हाऊस, बॉयलिंग हाऊस तसेच विस्तारिकरण प्रकल्पात जे अत्याधुनिक सयंत्रणा जी कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्या प्रत्येक विभागात म्हणजे एक्सकॅव्हेशन, फरमेन्टेशन, मल्टी इफेक्टीव्ह ईव्हॅपरेशन इ. विभागातील गरजेनुसार त्याठिकाणी स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

६) **<u>श्री शिवाजी दिगंबर जाधव, राहणार-जाधववाडी,तालुका-माळशिरस,जिल्हा-सोलापूरः-</u>**

प्रकल्पात रोजगाराची संधि प्राप्त होण्यासाठी काही शिक्षणाची अट आहे काय?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की, शिक्षणाची एवढीच अट असेल की १०वी किंवा १२वी उत्तीर्ण. तर तांत्रिक पदांवर काम करण्यासाठी औद्योगिक पदविका (diploma). त्यापुढील अट म्हणजे वसंतदादा शुगर इन्सिट्युट (व्हीएसआय), मांजरी, जिल्हा-पुणे यांची किंवा एनएसआय यांची पदवी प्राप्त व्यक्तींना त्यांच्या अनुभवानुसार प्रकल्पात प्राधान्य देण्यात येईल.

७) **<u>श्री. शिवराज जगदीश निंबाळकर, गाव-येळीव,तालुका-माळशिरस,जिल्हा-सोलापूरः-</u>**

आपण सांगितले की, प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी शुध्द करुन शेतीसाठी वापरण्यायोग्य करुन देणार आहेत. त्याचे आम्ही समर्थन करत आहोत. विस्तारिकरण प्रकल्पास आमचा पाठिंबा आहे.

८) **श्री. लक्ष्मण आगतराव पवार, राहणार-इस्लामपूर, तालुका-माळशिरस, जिल्हा-सोलापूरः-**

विस्तारिकरण प्रकल्प हा शेतक-यांच्या हिताचा आहे. त्यासाठी कारखान्याचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांचे मी अभिनंदन करतो. विस्तारिकरणामुळे येथील स्थानिक शेतक-यांच्या ऊसाचे वेळेत गाळप होणार आहे. त्यामुळे शेतक-यांचा फायदाच होणार आहे. तरी विस्तारिकरण प्रकल्पाबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे माझ्या इस्लामपूर ग्रामस्थांतर्फे अभिनंदन करतो. विस्तारिकरणास मंजूरी त्वरित मिळावी ही विनंती.

९) **श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, राहणार-तेलंगणाः-**

प्रकल्पात अतिशय सुंदर हरितपट्टा विकास केलेला आहे. त्याबद्दल प्रकल्प व्यवस्थापनाचे अभिनंदन. कुठल्याही प्रकल्पास पर्यावरण अनुमती (ईसी) प्राप्त होण्याचा कालावधी जास्त लागतो. तो कमी करण्याची विनंती मी भारत सरकारला करत आहे. तरी कुठल्याही प्रकल्पास सहा महिन्याच्या/एक वर्षाच्या आत पर्यावरण अनुमती (ईसी) उद्योगास प्राप्त होणे आवश्यक आहे.

मी एक पर्यावरणवादी असून आपल्या भारतात बेकारी हे सर्वात जास्त प्रदूषण आहे. येथे कारखाना जास्तीतजास्त लोकांना रोजगाराची संधि देणार आहे, त्याबद्दल कारखाना व्यवस्थापनाचे अभिनंदन.

प्रकल्पात अतिशय सुंदर हरितपट्टा विकसित करण्यात आलेला आहे, त्याबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे अभिनंदन. माझी विनंती आहे की, प्रकल्पात हरितपट्टा विकसित करताना औषधी वनस्पती व फळे येणारी झाडे लावण्यात यावी.

प्रकल्प व्यवस्थापनास विनंती आहे की, त्यांनी जास्तीतजास्त स्थानीक युवक-युवतींना प्राधान्य देण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पावसाचे पाणी साठविण्याचे (रुफ टॉप व टाकी) नियोजन अतिशय चांगले असून ते योग्यप्रकारे राबविण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तकांनी स्थानिक युवक-युवतींसाठी कौशल्यविकास कार्यक्रम हाती घ्यावा. प्रशिक्षित व्यक्तीस प्रकल्पात रोजगाराच्या संधिसाठी प्राधान्य देण्यात यावे. ज्यांना या प्रकल्पात संधि देता येणार नाही, त्यांना इतर उद्योगात संधि मिळू शकते.

मी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पास पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची विनंती करतो.

येथे प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी आश्वासन दिले की, आपण उपस्थित केलेल्या सूचनांचा प्रकल्प प्रवर्तक निश्चितच विचार करतील.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की, उपस्थितांना सूचना,विचार, आक्षेप नोंदविण्यास पुरेशी संधि देण्यात आलेली होती. सदरहू पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीमध्ये उपस्थितांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना प्रकल्प पर्यावरण सल्लागार व प्रकल्प प्रवर्तक यांनी अतिशय समर्पक उत्तरे दिलेली आहेत. याची नोंद घेण्यात आलेली असून त्यांचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मान्यतेने बैठकीचे इतिवृत्त, सुधारित पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेप हा सर्व दस्तावेज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल.

आयोजक यांनी उपस्थितांना काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक, र्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समीती यांच्यावतीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त लेखी सुचना/हरकती/टिप्पणी/तक्रारींची प्रत सोबत जोडले आहे.

**(निखिल जा. मोरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
सोलापूर

**(बाबासाहेब म. कुकडे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
पुणे

**(अभिजीत म. पाटील)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा - सोलापूर